# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१/ ७२/ ७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in, ई-मेल: affiliation@sus.ac.in

[ शैक्षणिक, संशोधन आणि विकास (संलग्नता विभाग) विस्तारीत क्रमांक : १२२ ]




वाचा: विद्यापीठाचे परिपत्रक क्र.पुअहोसोविसो/संलग्नता/२०२२/५२८०, दिनांक १२/०७/२०२२.

## परिपत्रक

संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/ संचालक यांना कळविण्यात आले होते की, ज्या महाविद्यालयांने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षासाठी महाविद्यालयाच्या सर्वसमावेश विकास आराखडयाच्या अनुषंगाने महाविद्यालय विकास समितीने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल विद्यापीठास सादर केलेला नाही, त्या महाविद्यालयांनी दिनांक ३१/०७/२०२२ पर्यंत अहवाल सादर करावा. तथापि, काही महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षांचा महाविद्यालय विकास समितीने केलेला वार्षिक अहवाल विद्यापीठास सादर केला नसल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.

यास्तव आपणांस पुन:श्च कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ (५) (द) मधील तरतूदीनूसार ज्या महाविद्यालयांनी महाविद्यालय विकास समितीचा अहवाल विद्यापीठास अद्यापपर्यंत पाठविलेला नाही, त्या महाविद्यालयांनी दिनांक ३०/११/२०२२ पर्यंत सादर करावा.

**तसेच मा. राज्यपाल तथा कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या JBVC च्या बैठकीतील मुद्दयांच्या अनुरोधाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ९७ (५) (क) मधील तरतूदीनुसार संलग्नित महाविद्यालयाने त्यांचा प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठीचा सर्वसमावेशक विकास आराखडा (IDP - Institutional Development Plan) तयार करावयाचा आहे. यास्तव शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीचा आपल्या महाविद्यालयाचा सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करुन तो महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा व त्याबाबतची माहिती विद्यापीठास दिनांक ३०/११/२०२२ पर्यंत सादर करावी.**

( योगिनी घारे)
कुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/परिपत्रक/ २०२२/ 9064
दिनांक : 23 NOV 2022

प्रति,
**मा. प्राचार्य/ संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर.